follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २७३ ✻ सातारा ✻ सातारा ✻ गुरूवार ✻ दि. १३ जून २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

## शेतकऱ्यांची नाराजी महायुतीला नडली : एकनाथ शिंदे

**मुंबई :** नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीला अपेक्षेप्रमाणे कामगिरी पार पाडता आली नाही. या पराभवाला शेतकऱ्यांची नाराजी हे एक प्रमुख कारण असल्याची कबुली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. कृषी क्षेत्रातील समस्यांवर मार्ग काढण्यासाठी केंद्र सरकारची मदत घेणार असल्याचेही त्यांनी सूचित केले आहे.

राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघांपैकी ४० हून अधिक जागा जिंकण्याचा दावा करणाऱ्या महायुतीला या लोकसभा निवडणुकीत मोठा फटका सहन करावा लागला. आता या पराभवाचे विश्लेषण केले जात आहे. अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे विश्लेषण महत्त्वाचे ठरणार आहे. शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शेतकऱ्यांची नाराजी हे या पराभवा मागच्या प्रमुख कारणांपैकी एक असल्याची कबुली दिली आहे.

कांद्याने आणले डोळ्यात पाणी

निवडणूक प्रचार मोहिमेदरम्यान नाशिक आणि उत्तर महाराष्ट्रात कांद्याने तर विदर्भ मराठवाड्यात कापूस आणि सोयाबीन ने आमच्या डोळ्यात पाणी आणले, असे शिंदे यांनी नमूद केले आहे.

स्थानिक बाजारपेठेतील दरवाढ रोखण्यासाठी केंद्र सरकारने डिसेंबर महिन्यात कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. ती मे महिन्याच्या सुरुवातीला उठविण्यात आली. या निर्यात बंदीचा फटका विशेषतः नाशिक परिसरातील शेतकरी आणि व्यापाऱ्यांना बसला. त्याबद्दल केंद्र सरकारच्या निर्णया विरोधात मोठ्या प्रमाणात आवाजही उठवण्यात आला. त्याचा परिणाम लोकसभा निवडणुकीत महायुतीला भोगावे लागला, असे निरीक्षण मुख्यमंत्र्यांनी नोंदविले आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांची भेट घेऊन कांदा, कापूस आणि सोयाबीन यांना चांगले दर निश्चित करण्याबाबत प्रयत्न करणार असल्याचेही शिंदे यांनी सांगितले.

### चारशे पारचा प्रचार नडला

**या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने ४०० पारचा नारा देत मोठ्या प्रमाणावर प्रचार केला. त्यामुळे विरोधक संपुष्टात आणून भाजपा आणि मित्रपक्ष घटनेला निष्प्रभ करणार, आरक्षण संपवून टाकणार या विरोधकांच्या प्रचाराला अधिक धार प्राप्त झाली. त्याचा फटका महायुतीला सहन करावा लागला, असेही शिंदे यांनी पराभवाचे विश्लेषण करताना नमूद केले आहे.**

# लोकसभेनंतर आता राज्यसभा निवडणुकांची रणधुमाळी

## 'या' १० जागांसाठी होणार मतदान

**मुंबई :** २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर आता सर्वांचे लक्ष राज्यसभा निवडणुकांवर लागले आहे. राज्यसभेचे १० खासदार लोकसभेवर निवडून गेल्यामुळे त्यांच्या रिक्त जागांसाठी लवकरच निवडणूक होणार आहे. राज्यसभा सचिवालयाने सांगितल्यानुसार, यात आसाम, बिहार आणि महाराष्ट्रातील प्रत्येकी दोन जागा, हरियाणा, मध्य प्रदेश, राजस्थान आणि त्रिपुरामधील प्रत्येकी एका जागेचा समावेश आहे.

यावेळी लोकसभा निवडणूक जिंकून १० राज्यसभा खासदार लोकसभेत पोहोचले आहेत. त्यामुळे वरिष्ठ सभागृहातील या सदस्यांच्या जागा रिक्त झाल्या आहेत. अधिसूचना प्रसिद्ध



झाल्यानंतर निवडणूक आयोग आता राज्यांच्या रिक्त जागा भरण्यासाठी निवडणुकांच्या नवीन तारखा जाहीर करेल.

कोणाच्या रिक्त झाल्या?

आसामचे कामाख्या प्रसाद तासा आणि सर्बानंद सोनोवाल, बिहारचे मीसा भारती आणि विवेक ठाकूर, हरियाणाचे दीपेंद्र सिंह हुड्डा आणि मध्य प्रदेशचे ज्योतिरादित्य सिंधिया, महाराष्ट्रातील उदयनराजे भोसले आणि पीयुष गोयल, राजस्थानचे केसी वेणुगोपाल आणि त्रिपुराचे बिप्लब कुमार देब यांनी लोकसभा निवडणूक जिंकल्यामुळे त्यांच्या राज्यसभेतील जागा रिक्त झाल्या आहेत.

### राज्यसभेच्या जागा कोणाकडे असतील?

**आसाम, बिहार आणि महाराष्ट्रातील प्रत्येकी दोन आणि हरियाणा, मध्य प्रदेश, राजस्थान आणि त्रिपुरामध्ये प्रत्येकी एका जागेवर निवडणूक होणार आहे. आसाममधील दोन्ही जागांवर भाजपचा विजय निश्चित मानला जात आहे. राज्यात भाजपचे सरकार आहे आणि पक्षाने राज्यात १४ पैकी ९ जागा जिंकल्या आहेत. बिहारमध्येही हीच परिस्थिती आहे. राजदला येथे नुकसान सहन करावे लागू शकते. मात्र, महाराष्ट्र आणि राजस्थानमध्ये निकराची लढत होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर हरियाणा, मध्य प्रदेश आणि त्रिपुरामध्ये भाजप राज्यसभेच्या जागा सहज काबीज करू शकते.**

## पुणे-मुंबई द्रुतगती मार्गाला आता सुधारणांचे 'वळण'

**पुणे :** पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील बेशिस्त वाहतुकीला आळा घालण्यासाठी या मार्गावर महामार्ग वाहतूक व्यवस्थापन व्यवस्था (हायवेज ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम - एचटीएमएस) राबवण्यात येणार आहे. या अंतर्गत करण्यात येणारी विविध कामे अंतिम टप्प्यात आहेत. त्यामुळे आगामी काळात या महामार्गावरील बेशिस्त वाहतुकीला आळा बसून अपघातांचे प्रमाण कमी होण्याचा दावा करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (महाराष्ट्र स्टेट रोड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन - एमएसआरडीसी) 'एचटीएमएस'अंतर्गत विविध कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यामध्ये ठरावीक अंतरावर वेग मर्यादेचे उल्लंघन करणारी वाहने ओळखणारी शोधप्रणाली (स्पीड डिटेक्शन सिस्टीम), मार्गिका उल्लंघन शोध प्रणाली (लेन डिसिप्लिन व्हायलेशन डिटेक्शन सिस्टीम) आदी यंत्रणा कार्यान्वित करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे वेगमर्यादा, मार्गिकेची शिस्त मोडणाऱ्या वाहनधारकांवर थेट कारवाई करून दंड आकारणे, तसेच बेशिस्त वाहनचालकांवर थेट कारवाई करणे शक्य होणार आहे. सध्या वाहतूक पोलीस आणि महामार्ग पोलिसांकडून बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्यात येत आहे.

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गाच्या प्रवासात अनेक वळणे, घाट, धबधबे आणि इतर निसर्गरम्य ठिकाणे असल्याने मार्गावरील प्रवासी रस्त्याच्या कडेला वाहने थांबवितात. तसेच उपाहारगृह किंवा इतर ठिकाणी वाहने थांबविल्याने वाहतुकीच्या दृष्टीने वर्दळीच्या या मार्गावर अपघात होत आहेत. त्याअनुषंगाने महामार्गालगत ठरावीक अंतरांवर वाहने थांबविण्याची सुविधा करण्याचेही प्रस्तावित आहे. या शिवाय पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरून प्रवास करणाऱ्या जड वाहनांसाठी घाट चढल्यानंतर दोन खास थांबे प्रस्तावित आहेत.

# बच्चू कडू महायुतीची साथ सोडणार?

## आगामी विधानसभा निवडणुकीबाबत केली मोठी घोषणा; म्हणाले

यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यासाठी उद्या मुंबईत बैठकही आयोजित करण्यात आली आल्याची माहिती बच्चू कडू यांनी दिली आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभा निवडणुकीतही बच्चू कडू महायुतीची साथ सोडण्याच्या तयारीत आहेत. आगामी विधानसभेत बच्चू कडूंनी २० जागा लढवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यासाठी उद्या मुंबईत बैठकही आयोजित करण्यात आली आल्याची माहिती बच्चू कडू यांनी दिली आहे. नागपूरमध्ये माध्यमांशी बोलताना त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.

### नेमकं काय म्हणाले बच्चू कडू?

उद्या मुंबईत पक्षाची बैठक आयोजित करण्यात आली आहेत. या बैठकीला पक्षाचे राज्यातील २० पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. यावेळी आगामी विधानसभा निवडणूक कशाप्रकारे लढवायची याबाबत सविस्तर चर्चा केली जाईल. येत्या विधानसभेत महाविकास आघाडीबरोबर जायचं की महायुतीबरोबर थांबायचं की स्वतंत्र लढायचं याबाबत सविस्तर चर्चा करून निर्णय घेऊ, अशी प्रतिक्रिया बच्चू कडू यांनी दिली. तसेच विधानसभा निवडणुकीत आम्ही २० जागा



लढण्याचा निर्णय घेतला आहे, असेही त्यांनी सांगितलं.

### राजकीय पक्ष म्हणून निवडणूक लढवावीच लागेल

यावेळी महायुतीत बरोबर असतानाही २० जागा लढवणार का? असा प्रश्न विचारला असता, महायुतीत असलो तरी याचा अर्थ आम्ही निवडणूक लढवू नये, असा होत नाही. एक राजकीय पक्ष म्हणून आम्हाला निवडणूक लढवावीच लागेल, निवडणूक लढवणं हा कोणत्याही राजकीय पक्षाचा मुख्य उद्देश असतो, त्याशिवाय राजकारण पूर्ण होत नाही, असं त्यांनी सांगितलं.

### महाराष्ट्रातल्या २० जागांवर निवडणूक लढवू

दरम्यान, या २० जागा या केवळ विदर्भातल्या असतील की संपूर्ण महाराष्ट्रातल्या, असं विचारलं असता, आम्ही संपूर्ण महाराष्ट्रातल्या २० जागांवर निवडणूक लढवू, अशी माहिती बच्चू कडू यांनी दिली.

मंत्रिपद मिळालं तरी घेणार नाही

पुढे बोलताना त्यांनी मंत्रिमंडळ विस्ताराबाबतही त्यांनी भाष्य केलं. मंत्रिमंडळ विस्तार झाला, तरी मला मंत्रीपद मिळणार नाही आणि त्यांनी मला मंत्रिपद दिलं, तरी मी ते घेणार नाही, असे बच्चू कडू म्हणाले.

## सातशे वारकऱ्यांसह, टाळकरी आणि पताकाधारी

# गजानन महाराज पालखीचे आषाढीसाठी प्रस्थान

**बुलढाणा :** पंढरपूर येथील आषाढी एकादशी यात्रा महोत्सवात दरवर्षी श्रींची पालखी सहभागी होते. पंढरपूर येथील आषाढी एकादशी यात्रा महोत्सवात सहभागी होण्याचे संस्थानचे हे ५५ वे वर्ष आहे. परंपरेनुसार यंदाही श्रीसंत गजानन महाराज संस्थानच्यावतीने श्रींची पालखी ज्येष्ठ शुद्ध सात म्हणजेच १३ जून रोजी सकाळी ७ वाजता प्रस्थान करणार आहे.

श्रींच्या पालखीत जवळपास सातशे वारकऱ्यांसह टाळकरी आणि पताकाधारी सहभागी होणार आहेत. हरीनामाच्या गजरात, मुखातून 'जय हरी विठ्ठल, श्री हरी विठ्ठल' नामाचा जप करीत पालखी संत नगरीतून पंढरपूरकडे प्रस्थान करेल. भूतलावरील वैकुंठ अशी ख्याती आणि महिमा असलेल्या पंढरपूरच्या विठोबाची महायात्रा आषाढी, कार्तिकी, चैत्र व माघी, अशा चार एकादशीला भरते. जो नित्याने वारंवार पंढरपूरला जातो तो वारकरी होय. श्रीसंत गजानन महाराजांच्या पुनीत वास्तव्याने पावन झालेल्या शेगाव नगरीला विदर्भाचे पंढरपूर म्हणून गौरविल्या जाते. पंढरीनाथाच्या भेटीसाठी प्रत्यक्ष शेगावच्या योगी गजाननाने हजारो वारकऱ्यांसह वारी केल्याचे दाखले मिळतात. त्यामुळे येथील वारीला असलेली परंपरा ही संतांनी दाखविलेल्या मार्गावर गेल्या ५५ वर्षांपासून अव्याहतपणे जपली जात आहे.

ज्येष्ठ शुद्ध ७, अर्थात १३ जून रोजी महाराजांची पालखी विठूरायाच्या भेटीला मार्गस्थ होणार आहे. टाळ, मृदंग वाजत, गाजत शेकडो वारकरी हातात भागवत धर्माची पताका व मुखी हरी नामाचा गजर करीत श्रींच्या पालखीसह पंढरीची वाट धरतील. श्रींच्या दिंडीमध्ये



पताकाधारी, गायक, मुंदगवादक, सेवेकरी, अशा एकूण सातशे जणांचा समावेश असतो. या दिंडीमध्ये एक विणेकरी आणि स्वयंशिस्तीने टाळकरी व पताकाधारी चालत असतात. मजल दरमजल करत ठरलेल्या ठिकाणी मुक्काम, तेथे भजन, कीर्तन, प्रवचन करीत भागवत धर्म वाढवण्याचा प्रयत्न करतात. मार्गावरील अनेक छोट्या-मोठ्या गावांना आनंदात सहभागी होण्याचे भाग्य मिळते.

पालखी यात्रेची दैनंदिनी

दिवसभर वारी आणि रात्रीचा मुक्काम, मुक्कामाचे दिवस आणि गावे ठरलेली असतात. मुक्कामाच्या ठिकाणी सकाळी काकडा, हरीपाठ, रस्त्याने भजन, श्रीची आरती, प्रवचन आदी कार्यक्रम नित्य नियमाने रोज होतात. स्वागत, वारी करणारा व ते स्वागत पाहणारे भक्तही भारावून जातात. मजल दरमजल करत मुखी संताचे अभंग गात पाउले श्रद्धेने पंढरीकडे चालत असतात. पाऊस असो वा ऊन, वारा अथवा थंडी, चालताना विठ्ठल दर्शनाची आस हीच ऊर्जा वारकऱ्यांना पुरेशी असते. प्रत्यक्ष श्रीसंत गजानन महाराजांची पालखी सोबत असल्याने जणू सर्व सुखाचे आगर सोबत असल्याची भावना असते.

तब्बल ३३ दिवसांचा पायी करून श्रींची पालखी आषाढ शुद्ध ९ म्हणजे १५ जुलै रोजी सोमवारी पंढरपुरी डेरे दाखल होणार आहे. यामुळे आनंदात न्हाऊन निघणारे शेकडो वारकरी पंढरीच्या भूमीवर पाय ठेवण्यापूर्वी तेथील माती कपाळाला लावून जणू विठ्ठलमयच होऊन जातात. त्यांच्या महिनाभराच्या पायदळ वारी, खडतर वाटचालीचे चीज होते.

### अकोल्यात दोन दिवस मुक्कामी

**गुरुवारी सकाळी शेगाव येथून प्रस्थान करणारी पालखी दुपारी मध्यान्ही नागझरी येथे पोहोचणार आहे. संत गोमाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पुनीत या भूमीत महाप्रसाद घेतल्यावर पालखी पुढे मार्गस्थ होईल. पहिला मुक्काम पारस (जि. अकोला) येथे राहील. १४ जूनला पारस येथून गायगाव येथे महाप्रसाद आणि त्यानंतर भौराद येथे मुक्काम राहील. आजवरच्या परंपरेप्रमाणे पालखी १५ आणि १६ जून असे सलग दोन दिवस अकोला महानगरीत मुक्कामी राहणार आहे. यामुळे दोन दिवस राजेश्वर नगरी 'गण गण गणात बोते'च्या गजराने गुंजणार आहे. लाखो अकोलावासी भक्तासाठी श्रींचा दीर्घ मुक्काम एक पर्वणीच ठरणार आहे.**

# महाराष्ट्रात शिंदे सरकारला धोका, सत्तांतर होणार ?



## सत्ताधारी पक्षातील आमदारांची धाकधूक वाढली

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी बजावीत सत्ताधा-यांना धक्का दिला आहे. सत्ताधारी आमदारांच्या मतदार संघात महाविकास आघाडी आघाडीवर असल्याने महायुतीच्या आमदारांची धाकधूक वाढली आहे. अवघ्या तीन महिन्यांवर विधानसभा निवडणूक येऊन ठेपली आहे त्यामुळे लोकसभेच्या निकालाप्रमाणेच विधानसभेचा निकाल लागल्यास महाराष्ट्रात सत्तांतर अटळ आहे अशीच चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागांपैकी काँग्रेस १३, ठाकरेंच्या शिवसेनेला १०, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार ८ तर भाजप ९, शिंदे सेनेला ७, राष्ट्रवादी अजित पवार १ अशा जागा मिळवल्या आहेत. मागील वेळेस २३ जागा पटकावणा-या भाजपला अवघ्या ९ जागांवर विजय मिळवता आला आहे. त्यामुळे १४ जागांवर भाजपचा दारूण पराभव झाला आहे. भाजपने शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन पक्ष फोडून राज्यात सत्ता मिळवली. गेल्या दोन वर्षापासून शिंदे फडणवीस आणि पवार सरकार सत्तेत आहे. मात्र पक्षफोडीचा फटका भाजपला लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर सहन करावा लागला आहे.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत एनडीएला ४१ जागांवर विजय मिळाला होता. यातील २३ भाजपाच्या तर १८ शिवसेनेच्या होत्या. त्याउलट राष्ट्रवादी काँग्रेसला ४ आणि काँग्रेसला फक्त एकाच जागेवर विजय मिळवता आला होता. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मात्र राजकीय चित्र पूर्णपणे बदललेलं आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसनं २५ जागा लढवून फक्त एकाच जागेवर विजय मिळवला होता.

अवघ्या तीन महिन्यांवर विधानसभा निवडणूक येऊन ठेपली आहे. राज्यात भाजपचे १०५ आमदार आहेत. मात्र लोकसभेच्या निकालात भाजपच्या ४२ आमदारांच्या मतदार संघामध्ये महाविकास आघाडीने बाजी मारली आहे. शिवसेना शिंदेचे ४० आमदार आहेत त्यातील १४ आमदारांच्या मतदार संघात मविआ आघाडीवर आहे. शिंदेंच्या २६ जागा धोक्यात आहेत. तर राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या ४० आमदारांपैकी २५ आमदारांच्या मतदार संघात महाविकास आघाडीने मुसंडी मारल्याने या जागांवर धोका आहे. त्यामुळे भाजपसह शिंदे आणि अजित पवार यांना मोठा धक्का समजला जात आहे.

शिवसेनेचे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षाचे दोन तुकडे झाल्याने उध्दव ठाकरे आणि शरद पवार यांनी पक्षाचे नाव आणि चिन्ह नवीन असतानाही लोकसभा निवडणूक चांगलं यश मिळवलं. फोडाफोडीचे राजकारण महाराष्ट्रातील जनतेला पटले नसल्यानेच त्यांच्या बाजूने सहानुभूतीची लाट निर्माण झाली त्यामुळेच त्यांना यश मिळाल्याचं राजकीय विश्लेषकांकडून सांगितले जात आहे. सध्या ठाकरेंच्या शिवसेनेकडे १५ आमदार आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीत हा आकडा दुप्पट होऊन ३० आमदार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहेत. काँग्रेसचे ४५ आमदार आहेत विधानसभा निवडणुकीत २७ आमदार वाढण्याची शक्यता आहे त्यामुळे काँग्रेसच्या आमदारांचा आकडा ७२ वर जाण्याची शक्यता आहे तर शरद पवारांकडे सध्या १२ आमदार आहेत त्यांचे ४० आमदार वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचे १५० च्या अधिक आमदार निवडून येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत आणखी काय काय घडामोडी घडतात याकडे लक्ष वेधले आहे.

## संपादकीय

# सर्वसमावेशक नेते

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत सर्वाधिक २४० जागा मिळवूनही बहुमतापासून दूर असल्यामुळे भाजपला आघाडी सरकारचा पर्याय स्वीकारावा लागला.

सत्तेच्या प्रमुख पदावर सलग २३ वर्षे राहिले आहेत असे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे लोकशाही जगातील एकमेव नेते आहेत. ते १३ वर्षे गुजरातचे मुख्यमंत्री होते आणि त्यानंतर गेली १० वर्षे भारताचे पंतप्रधान आहेत. आता त्यांची पुढील पाच वर्षांसाठी पंतप्रधान म्हणून निवड झाली आहे. एका अर्थाने हा त्यांच्या लोकप्रियतेवर जनतेच्या पसंतीचा शिक्का आहे. दहा वर्षे पंतप्रधान राहूनही, त्यांची लोकप्रियता निरंतर टिकून आहे. लोकांनी या निवडणुकीत पंतप्रधान म्हणून मोदी यांनाच पसंत केले आहे, हे सत्य आहे.

अनेकांचा असा गैरसमज झाला आहे की पंतप्रधान मोदींना पहिल्यांदाच संयुक्त सरकार चालवावे लागणार आहे, पण ते खरे नाही. २०१४ आणि २०१९ ही दोन्ही सरकारे एनडीएचीच होती. त्यातही घटक पक्षांचे खासदार मंत्री होते आणि दर अधिवेशनापूर्वी एनडीएची संयुक्त बैठक व्हायची.

नरेंद्र मोदी यांचे गुजरातचे १३ वर्षांचे शासन म्हणजे सर्वांना विश्वासात घेऊन एका राज्याला प्रगतीच्या नव्या टप्प्यावर नेऊन ठेवण्याचा कालखंड होता. या काळात पूर, भूकंप आणि अनेक नैसर्गिक संकटे आली. त्याचबरोबर दंग्यामुळे परिस्थिती बिघडली होती, पण त्यांनी कायदा सुव्यवस्था आणि त्याचबरोबर सर्व समुदायांमध्ये एक विश्वासाचे वातावरण तयार केले आणि म्हणून गेल्या १२ वर्षांत तिथे एकही दंगल झाली नाही.

मुख्यमंत्री म्हणून आणि पंतप्रधान म्हणून त्यांनी केलेल्या कामाचा उल्लेख असणारे 'मोदी २०' हे पुस्तक फार महत्त्वाचे आहे. कारण त्यामध्ये विविध क्षेत्रातील २० मान्यवर व्यक्तींनी लेख लिहिले आहेत, आपले अनुभव सांगितले आहेत. या पुस्तकातून मोदींचा राजकारणाकडे बघण्याचा दृष्टिकोन दिसतोच आणि त्याचबरोबर आवश्यक त्या सर्वांना बरोबर घेऊन प्रश्नाची सोडवणूक कशी करायची याचे दर्शन घडते. एका अर्थाने हे 'गुड गव्हर्नन्स' चे पुस्तक आहे. हे पुस्तक वाचल्यावर लक्षात येते की मोदींची दृष्टी केवळ पक्षीय किंवा संकुचित नाही तर विकासासाठी पूरक अशा सर्वांचा सहयोग घेण्याचीच आहे. मला वाटते की हीच त्यांच्या पुढील दहा वर्षांच्या एनडीए सरकारच्या यशाची गुरुकिल्ली आहे.

ते जेव्हा कुणालाही भेटतात तेव्हा ते पूर्ण वेळ लक्ष देऊन बोलणाऱ्याचे म्हणणे ऐकतात, त्यातला मुद्दा समजून घेतात. त्यासंदर्भात अधिक माहिती हवी असेल तर तेवढी विचारतात. जो कोणी त्यांना भेटतो तो त्यांच्यामुळे प्रभावित होऊन जातो. कारण जिथे दहा मिनिटे वेळ दिलेला असतो, तिथे अर्धा तास सहज जातो. ते अवांतर गप्पा मारत नाहीत. तुमचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतात. मोदी 'गुड लिसनर' आहेत.

ते सर्वांबरोबर काम करू शकतात आणि ते कसे सर्वांबरोबर काम करतात ते मी दहा वर्षे प्रत्यक्ष पाहिलेले आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत कोणाही मंत्र्याला ठेवलेल्या विषयावर वेगळे मत असल्यास मांडण्याचा पूर्ण अधिकार असायचा. ते शांतपणे ऐकून घ्यायचे आणि त्या म्हणण्यामध्ये दम आहे असे वाटले तर अधिकाऱ्यांना सांगायचे की हा विषय आज पुढे ढकलू या आणि यानंतर पुन्हा एकदा नीट विचार करून, जे मुद्दे उपस्थित झाले त्यांचा परामर्श घेऊन मग पुन्हा मंत्रिमंडळात ठेवा. ते कुणालाही बोलू देत नाहीत असा गैरसमज असू शकतो. पण मंत्रिमंडळाच्या प्रत्येक बैठकीत रामविलास पासवान तसेच भाजपाचे इतर मंत्रीही आपापले मत मांडायचे. आणि हेच यापुढेही सुरू राहील.

मोदीजींसाठी राजकारण हे २४ तास करायचे व्रत आहे. त्यांचा तो व्यवसाय नाही किंवा त्यांचा तो नुसता छंद नाही. देशाचे काही भले करण्यासाठी आपल्याला मिळालेली ही संधी पुरेपूर वापरायची आहे, हे त्यांच्या सतत मनात असते आणि सहकाऱ्यांच्या मनावरही ते सतत हेच बिंबवत असतात. त्यामुळे २०२४ ते २०२९ या पाच वर्षांच्या काळात हे सरकार उत्तम पद्धतीने चालेल याविषयी मला कोणतीही शंका नाही.

मोदींना राजकारणाची जबरदस्त समज आहे. सगळे छोटे-मोठे प्रवाह ते टिपत असतात. त्यांच्याकडे नेमकी, महत्त्वाची अशी माहिती सतत येत असते. त्यांची जबरदस्त स्मरणशक्ती त्यांना खूप उपयोगी पडते. ते लगेच संबंधित माणसांशी बोलून परिस्थिती समजावून घेतात. त्याच्यावर काय उपाय करता येईल याबाबत दहा ठिकाणांहून वेगवेगळी माहिती घेतात आणि त्या माहितीच्या आधारावर ठाम निर्णय घेतात. पण त्यावर कोणाला चर्चा करायची असेल तर त्याला ते कधीही नाही म्हणत नाहीत. शेवटी संयुक्त सरकार चालवताना त्यामध्ये घटक पक्षांचा संवाद महत्त्वाचा असतो आणि तो ते निश्चितपणाने पार पाडतील याची मला खात्री आहे, कारण मला तसा अनुभवही आहे.

मोदींचा आणखी एक विशेष आहे. ते केवळ सरकारमधीलच नव्हे, केवळ एनडीएच्याच नव्हे तर सर्व खासदार, सर्व मुख्यमंत्री यांनाही तितक्याच आदराने वागवतात. मनमोहन सिंग, देवेगौडा आणि अन्य ज्येष्ठ नेत्यांशी त्यांचे वागणे मी जवळून पाहिले आहे. केवळ भाजपच्याच नव्हे, तर अन्य पक्षांच्या आमदार व मुख्यमंत्री यांच्याही व्यक्तिगत सुखदु:खामध्ये ते सामील होतात, स्वत:हून चौकशी करतात. अधूनमधून संपर्क करतात. शिवसेना २०१९ नंतर मोदींच्या सरकारमधून बाहेर पडली त्या वेळेला अरविंद सावंत हे मंत्री होते. त्यानंतरही नेहमी मोदी त्यांची आस्थेने चौकशी करायचे. अशीच चौकशी आणि संबंध त्यांनी अकाली दल बाहेर पडल्यावरही त्यांच्याशीही ठेवले. मला वाटते घटक पक्षांबरोबर सरकार चालवण्याचाच हा परिणाम आहे.

अटलजींनी सहा वर्षे घटक पक्षांबरोबर एनडीए सरकार चालवले. त्याच परंपरेत मोदी गेली दहा वर्षे सरकार चालवत आहेत आणि याही पुढे चालवत राहतील याची खात्री बाळगावी. कोणी अवाजवी मागणी केली तर ते आपले मत स्पष्ट सांगतात, पण ते खासगी बैठकीत. मला तरी या सरकारच्या भविष्याविषयी तसेच स्थैर्याविषयी जराही शंका वाटत नाही.

जेडीयू, तेलगू देसम या पक्षांच्या सहभागामुळे लोकांच्या मनात ही शंका आली. पण हे दोन्ही पक्ष गेल्या दहा वर्षांत काही काळ एनडीए सरकारचा भाग होते. तेलगू देसम २०१८ पर्यंत सरकारचा भाग होते आणि जेडीयू २०१६ पर्यंत आणि पुन्हा २०२२ पासून सरकारमध्ये आहेच. त्यामुळे २०२४ साली काही तरी वेगळेच घडले आहे आणि आता मोदी हे सरकार कसे चालवतील असा प्रश्न उपस्थित होण्याचे काही कारणच नाही.

काल झालेल्या एनडीएच्या बैठकीमध्ये त्यांनी एकदाही भाजप सरकार असे म्हटले नाही. त्यांनी एनडीए सरकार असाच उल्लेख सातत्याने केला. सर्व पक्षाच्या नेत्यांनी उत्स्फूर्तपणे मोदीजींचे स्वागत केले आणि त्यांच्या नावाला पाठिंबा दिला. त्यांची सगळ्यांची भाषणेही हे सरकार दीर्घकाळ चालेल याची ग्वाही देणारी होती.

# सोलापुरात विधानसभा निवडणुकीसाठी शिंदे गटाची तयारी सुरु

**सोलापूर :** सोलापूर लोकसभेच्या निवडणुका संपल्यानंतर सोलापुरात आणि राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघात सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांनी हालचाली सुरू केल्या आहेत. महाविकास आघाडीच्या नेत्या प्रणिती शिंदें सोलापूर शहर मध्यच्या तीन वेळा आमदार होत्या. लोकसभा निवडणुकीत प्रणिती शिंदे आमदार असलेल्या मध्य विधानसभा मतदारसंघातून फक्त ७०९ मतांची आघाडी होती. महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांनी प्रणिती शिंदेंच्या होम पिचवर जबरदस्त टक्कर दिली.



आगामी विधानसभा निवडणुकीत सोलापूर शहर मध्य, दक्षिण सोलापूर, सांगोला, मोहोळ, करमाळा शिंदे गटाचे आमदार मोठ्या मताधिक्याने निवडून येतील, असा विश्वास शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष मनीष काळजे यांनी व्यक्त केला आहे. लोकसभा निवडणुकीत सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघावर महाविकास आघाडीला मोठी अपेक्षा होती.

सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातून प्रणिती शिंदें या २००९ पासून तीन वेळा आमदार आहेत. या मतदारसंघातून प्रणिती शिंदे ५० हजार मतांचे मताधिक्य घेतील, असे म्हटले जात होते. मतमोजणी झाल्यानंतर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातून प्रणिती शिंदे फक्त ७०९ मतांची आघाडी घेऊ शकल्या. महायुतीचे उमेदवार राम सातपुतेंना झालेला मतदान पाहून महायुतीचे नेते ॲक्टिव्ह झाले आहेत. सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघात मुस्लिम, पद्मशाली, मोची समाज बांधवांची मतदान संख्या मोठ्या संख्येने आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते जुबेर बागवान यांनी अजित पवार यांच्याकडे सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. जुबेर बागवान यांनी देखील या बातमीला दुजोरा दिला आहे. आगामी विधानसभा निवडणूकित महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या लढतीत एमआयएम उमेदवार फारूक शाब्दी यांची सीट निघेल, असा अंदाज राजकीय विश्लेषकांनी व्यक्त केला आहे. २०१४ आणि २०१९ मध्ये एमआयएमच्या उमेदवाराने दुसऱ्या क्रमांकाची मते प्राप्त केली होती. २०२४ मध्ये एमआयएम पूर्ण ताकदीने उतरणार असल्याची माहिती एमआयएम नेत्यांनी अनेकदा व्यक्त केली आहे.

# असंगाशी संग करणे अंगाशी आले: संघाने भाजपला सुनावले खडे बोल

**नवी दिल्ली :** नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत ४०० पारची भाषा करणाऱ्या भारतीय जनता पक्षाला मोठ्या अपयशाला सामोरे जावे लागले आहे. या पराभवाचे विश्लेषण करताना संघ परिवाराचे मुखपत्र असलेल्या ऑर्गनायझरने पक्षाला असंगाशी संग नडला असल्याचे सुनावत भाजपला घरचा आहेर दिला आहे. महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश या सर्वाधिक खासदार संख्या असलेल्या राज्यातील पराभवाला भाजप स्वतःच कारणीभूत असल्याचे ऑर्गनायझरने दाखवून दिले आहे.

भाजप आणि शिवसेना यांची हिंदुत्वाच्या विचारावर आधारित नैसर्गिक युती आहे. भाजपा शिवसेना युतीचे सरकार बहुमताने महाराष्ट्रात कार्यरत असताना राष्ट्रवादी काँग्रेस मधील बंडखोर अजित पवार यांच्याशी भाजपने केलेली जवळीक भाजपाच्या हक्काच्या मतदारांना आवडलेली नाही. अजित पवार आणि त्यांचे सहकारी यांच्या कथित भ्रष्टाचाराबद्दल एकेकाळी भाजपने आगपाखड केली होती. अजित पवार यांना तुरुंगाची हवा खायला लावणार असल्याची बढाई देखील मारली होती. राज्यात बहुमत असताना अशा अजित पवार यांना सोबत घेण्याची कोणती गरज भाजपला वाटली, असा सवाल ऑर्गनायझरमधील आपल्या लेखात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विचारवंत मानल्या जाणाऱ्या रतन शारदा यांनी आपल्या लेखात केला आहे.

याच लेखात जुने काँग्रेसवासी कृपाशंकर सिंह यांना भाजपमध्ये प्रवेश देऊन लगेच खासदारकीचे तिकीट देण्याच्या निर्णयावरही कठोर टीका करण्यात आली आहे. महाराष्ट्रात मंत्री राहिलेले कृपाशंकर सिंह यांच्यावर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप आहेत. त्याचप्रमाणे २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जबाबदार असल्याचे कथित पसरविण्यात कृपाशंकर सिंह यांचा हातभार असल्याचा संघाचा आरोप आहे. कृपाशंकर सिंह यांना भाजपमध्ये घेण्यास अनेकांनी विरोध व्यक्त करूनही त्याची दखल न घेता मुंबईमध्ये कृपाशंकर सिंह यांना भाजपमध्ये प्रवेश देण्यात आला आणि लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेश मधून त्यांना उमेदवारीही देण्यात आली. या निर्णयावर संघ स्वयंसेवक नाराज असून त्याचे पडसाद लोकसभा निवडणुकीच्या निकालात उमटले, असे या लेखात नमूद करण्यात आले आहे.

मोदींच्या चेहऱ्यावर विसंबून संघ राहिला उपेक्षित

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही अराजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक संघटना असली तरीही ती भारतीय जनता पक्षाची मातृसंस्था आहे. निवडणुकीच्या काळात या संघटनेची सुसज्ज यंत्रणा भाजपच्या मदतीला उभी असते. या निवडणुकीत मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चेहऱ्याकडे पाहून मतदार भाजपला भरभरून मतदान करतील या समजूतीने भाजपकडून संघाच्या यंत्रणेची दखल घेतली गेली नाही. प्रचार मोहिमेदरम्यान संघ स्वयंसेवकांना मदतीसाठी साद घातली गेली नाही. उलट पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनी भाजपाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची गरज नाही, असे विधान केले. त्यामुळे संघ स्वयंसेवक निवडणुकीच्या कामापासून लांब राहिला. त्याची फळे भाजपाला भोगावे लागली, असेही त्यात दाखवून देण्यात आले आहे.

# सरकारच्या नाही देशाच्या भवितव्याची काळजी: उद्धव ठाकरे

**मुंबई :** केंद्रात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सत्तारूढ झालेल्या सरकारच्या भवितव्याविषयी आपल्याला काही देणे घेणे नाही. आपल्याला देशाच्या भवितव्याची काळजी आहे, असे प्रतिपादन शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने भाजपला खडे बोल सुनावले आहेत. देशातील जनतेनही भाजपला खडे चारले आहेत. यापासून धडा घेऊन आता तरी भाजप सुधारणार का? केंद्रात सत्तेवर असलेले सरकार देशासमोर असलेल्या समस्यांचे निवारण करणार की त्याबद्दल आवाज उठवणाऱ्या विरोधी पक्षांना संपवण्याचे उद्योग करणार, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला आहे.

मणिपूरमध्ये हिंसाचाराचा आगडोंब उसळल्यानंतर तब्बल वर्षभराने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी याबाबत विधान केले आहे. या घटनेचे गांभीर्य सरसंघचालकांपर्यंत पोहोचविण्यासाठी वर्षभराचा कालावधी घेणारी संघाची संपर्क यंत्रणा सुधारणे गरजेचे आहे. आता खुद्द भागवत यांनी मणिपूर कडे लक्ष देण्याची गरज व्यक्त केल्यानंतर तरी पंतप्रधान मनिपुर ला जाणार का, असा प्रश्नही ठाकरे यांनी विचारला.

काश्मीर खोऱ्यात पुन्हा हिंसाचाराने पेट घेतला आहे. कलम ३७० रद्द केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतःची पाठ थोपटून घेत आहेत. प्रत्यक्षात हे कलम रद्द करण्यात आलेले नाही तर स्थगित करण्यात आले आहे, अशी टीकाही ठाकरे यांनी केली. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चंद्राबाबू नायडू असे नेते शपथविधीचे सोहळे साजरे करत असताना इकडे लोकांचे जीव जात आहेत. आपल्या सुरक्षा रक्षकांवर हल्ले होत आहेत. अशा परिस्थितीत सरकार त्याकडे लक्ष देणार की आपल्या रेकॉर्डचे तुणतुणे वाजवत राहणार, असा सवालही ठाकरे यांनी केला.

# पुण्यात पुन्हा एकदा भरधाव कारने महिलेला उडवले

**पुणे :** पुण्यात पुन्हा एकदा भरधाव कारने महिलेला उडवल्याची घटना घडली आहे. या घटनेचा सीसीटीव्ही आता समोर आला असून या अपघातातील महिला थोडक्यात बचवाली आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. हा अपघातात २३ मे रोजी घडला असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

हिंजवडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कन्हैया थोरात यांनी याबाबत दिलेल्या माहितीनुसार, हिंजवडी परिसरात २३ मे २०२४ रोजी ही महिला रस्त्याने पायी जात होती. त्यावेळी अचानक भरधाव वेगात आलेल्या कारने त्या महिलेला जोरात धडक दिली.

महिला हवेत उडून खाली पडली. कारवरील चालकाचा ताबा सुटलेली कार एका दुकानात शिरली. त्यानंतर या अपघाताचे सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झाले आणि हा प्रकार समोर आला आहे. या घटनेतनंतर पोलिसांनी संबंधित महिलेच्या नातेवाईकांना संपर्क केला.

मात्र, आपली कोणतीही तक्रार नसल्याचे नातेवाइकांकडून सांगण्यात आले. तसेच, संबंधित महिलेची प्रकृती स्थिर असल्याचे नातेवाईकांनी पोलिसांना सांगितले आहे. या घटनेचा सीसीटीव्ही समोर आल्यानंतर पुण्यातील पोर्शे अपघाताची आठवण ताजी झाली. या घटनेची पोलिसांकडून कोणतीही दखल घेण्यात आली नसल्याचा आरोप नागरिकांडून करण्यात आला आहे.

या घटनेनंतर संबंधित महिला आणि तिच्या नातेवाईकांनी तक्रार दिली नसल्याने पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

मात्र, अपघाताचे सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झाल्यानंतर पोलिस यंत्रणेला जाग आली असून कार चालकावर या प्रकरणात मोटार वाहन कायदा २७९ नुसार गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे. या घटनेने काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# पोलीस निरीक्षक विजय वाघमारे यांच्या मुलाची वैदयकीय क्षेत्राकडे वाटचाल



**पुणे/पिंपरी चिंचवड :** पुणे मुंबई रस्त्यावर असलेले देहूरोड पोलीस स्टेशन येथील निरीक्षक विजय वाघमारे यांना दोन मुले आहेत एक उच्च शिक्षण घेण्यासाठी अमेरिका आहे तर दुसरा आदित्य विजय वाघमारे पाटील याने नीट परीक्षेत ७२० पैकी ६८४ गुण मिळवून दैदिप्यमान यश संपादन केले आहे.

आदित्य वाघमारे हा देहूरोड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय वाघमारे यांचा मुलगा आहे.

विजय वाघमारे हे एक शेतकरी कुटुंबातील असून नीट परीक्षेत आदित्य वाघमारे याने घवघवित यश मिळवल्या बद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.जिद्द आणि कष्ट केले तर यश हमकाश मिळते हे शेतकरी कुटुंबातील आदित्य वाघमारे याने सिद्द करून दाखविले आहे.

# कृषीविभागाने अतिरिक्त साठा मंजूर करावा; उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश

**मुंबई :** राज्यात काही ठिकाणी चांगला पाऊस पडला असून शेतकऱ्यांनी पेरणीच्या पूर्वतयारीला सुरुवात केली आहे. त्यामुळे राज्यात बी-बियाणे आणि खतांच्या मागणीत वाढ होत आहे. शेतकऱ्यांना युरिया आणि डीएपी खतांचा पुरेसा पुरवठा केला जात असला तरी येणाऱ्या काळात खतांचा तुटवडा जाणवू नये यासाठी राज्यशासनातर्फे खतांचा संरक्षित साठा (बफर स्टॉक) करण्यात येतो. पणन महासंघासह इतर संस्थांनी आवश्यकतेनुसार व प्राप्त उद्दिष्टानुसार आपल्या वाट्याच्या खतसाठ्याची संपूर्ण उचल करावी. तसेच त्यानंतरही आवश्यकता असल्यास कृषी विभागाने पणन महासंघास अतिरिक्त कोटा मंजूर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठकीत दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या मंत्रालयीन दालनात आज पणन महासंघाच्या विविध मागण्यासंदर्भात बैठक घेतली.

या बैठकीला कृषीमंत्री धनंजय मुंडे, पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे, उपाध्यक्ष रोहित निकम, संचालक पांडुरंग घुगे, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, सहकार व पणन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव अनुपकुमार, नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे संचालक परिमल सिंह, पणन महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक श्रीधर डुबे-पाटील,



नाफेडच्या व्यवस्थापक भाव्या आनंद आदी उपस्थित होते.

पणन महासंघाने राज्यातील शेतकऱ्यांसाठी चांगले काम केले आहे. महासंघाने आपल्या कामात आणखी सुधारणा करून शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न करावेत, यासाठी शासनातर्फे महासंघाला अधिक सहकार्य करण्यात येईल. राज्यात जिल्हा पणन कार्यालयांच्या माध्यमातून ग्रामीण सहकारी संस्थांच्या मदतीने गावपातळीपर्यंतच्या शेतकऱ्यांना वाजवी दरात खतांचे वितरण करण्यात येते. यामुळे पणन महासंघाअंतर्गत काम करणाऱ्या सहकारी संस्थांच्या उत्पन्नात वाढ होण्यासही मदत होते. या पार्श्वभूमीवर कृषीविभागाने पणन महासंघास आवश्यकतेनुसार व प्राप्त उद्दिष्टानुसार संरक्षित खतसाठा वितरित करावा. धान खरेदीसाठी आवश्यक असणारा बारदाण पूर्वीप्रमाणे महासंघामार्फत खरेदीसाठी शासन स्तरावर आवश्यक कार्यवाही केली जावी. केंद्रशासनाने ठरवून दिलेल्या दराने आणि त्यांच्या पॅनेलवरील पुरवठादारांकडून बारदाण खरेदीसाठी महासंघाने स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी व्हावे, अशा सूचनाही उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

शालेय पोषण आहार योजनेत पणन महासंघ निविदा प्रक्रियेद्वारे नियमानुसार सहभागी होऊ शकतो. अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाकडून चना व तूर विक्री तसेच अनुषंगिक खर्चापोटी आणि धान व भरड धान्य खरेदी पोटी अनुषंगिक खर्चाची प्रलंबित रक्कम मिळण्याबाबत शासनस्तरावर नियमाप्रमाणे कार्यवाही सुरू आहे. याबाबत लवकर तोडगा काढण्यासाठी मुख्य सचिवांनी बैठक घेऊन योग्य शिफारशी कराव्यात. नाफेड अंतर्गत खरेदी केलेल्या कडधान्य वाहतूक रकमेबाबतीतही गतीने कार्यवाही करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित विभागांना दिले. पणन महासंघाच्या कृषी, पणन आणि अन्न व नागरी पुरवठा विभागाकडील अन्य मागण्यांवर देखील सकारात्मक चर्चा झाली. याबाबतीतही वेगाने निर्णय घेण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिले. अन्न व नागरी पुरवठा विभागाने त्यांच्या सचिवांच्या स्तरावर बैठक घेऊन पणन महासंघाने मागणी केलेल्या प्रलंबित रकमेबाबत अहवाल द्यावा, असेही अजित पवार यांनी यावेळी सांगितले.

# जरांगे-पाटील यांच्या मागण्यावर सरकार कारवाई करत आहे

**मुंबई :** मनोज जरांगे-पाटील यांचे उपोषण सुरू आहे त्याबाबत सरकार गंभीर असल्याचे ते म्हणाले. त्यांच्या मागण्यावर सरकार कारवाई करत आहे. मागच्या काळात आम्ही त्यांना केसेस परत घेण्याचे आश्वासन दिले होते त्यावर प्रक्रिया सुरू आहे. त्यांची जी मागणी आहे त्याबाबत देखील सरकारने पहिले नोटिफिकेशन जारी केलेले आहे. त्यावर कार्यवाही सुरू असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. याप्रकरणात सरकार सकारात्मक असल्याचे मत देवेंद्र फडणवीस यांनी मांडले.

मी ओबीसी नेत्यांशी चर्चा करत आहे. छगन भुजबळ यांच्याशी देखील चर्चा करून मी त्यांना समजावून सांगणार आहे. ज्यांच्याकडे कुणबी दाखला आहे त्यांना सर्टिफिकेट देता येते. सर्वोच्च न्यायालयाने जे निकष ठरवून दिलेत त्यात बसणारच नोटिफिकेशन काढण्यात आले. ओबीसी समाजावर कुठलाही अन्याय होणार नाही. या प्रश्नी मार्ग काढण्याचा आमचा प्रयत्न आहे. मनोज जरांगे पाटील यांनी आपले उपोषण मागे घेतले पाहिजे असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. आरक्षणाबाबत सरकार नेहमीच सकारात्मक राहिले आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

यापूर्वी आंदोलनादरम्यान आणि आताच्या उपोषणापूर्वी सुद्धा मनोज जरांगे -पाटील यांनी फडणवीस यांच्यावर टीकास्त्र सोडले होते. ते काड्या करत असल्याचा आरोप त्यांनी केला होता. विधानसभेच्या तोंडावर राज्य सरकार आता मराठा आंदोलन कसे हाताळते याकडे सर्वांचे लक्ष लागेल आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# विधानसभेच्या आधी मंत्रीमंडळ विस्ताराचे गाजर

## पावसाळी अधिवेशापूर्वी विस्तार होण्याची चिन्हे

**मुंबई :** राज्यात महायुतीला आलेल्या अपयशाच्या पार्श्वभूमीवर विधानसभेला ताकदीने सामोरे जाण्यासाठी मंत्रीमंडळ विस्ताराचे गाजर पुढे करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. पावसाळी अधिवेशापूर्वी हा विस्तार होण्याची चिन्हे आहेत. यामध्ये दक्षिण महाराष्ट्रातून जनसुराज्य शक्ती पक्षाचे विनय कोरे, भाजपचे सहयोगी सदस्य प्रकाश आवाडे, शिवसेनेचे राजेंद्र पाटील यड्रावकर व सांगलीचे गोपीचंद पडळकर यांची नावे आघाडीवर आहेत.

तीन महिन्यातच महायुतीला विधानसभेला सामोरे जावे लागणार आहे. लोकसभा निवडणुकीत भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाला मोठे अपयश आले. मुख्यमंत्री शिंदेंच्या शिवसेनेला ५० टक्के यश मिळाले. राज्यात महाविकास आघाडीची हवा असल्याचे चित्र लोकसभेत दिसले. यामुळे विधानसभेला सामोरे जाण्यासाठी तातडीने काही बदल करण्याचा निर्णय महायुतीने घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून मंत्रीमंडळ विस्तार, महामंडळ नियुक्ती व दुसऱ्या फळीतील नेत्यांना पदे देण्यात येणार आहेत. दक्षिण महाराष्ट्रात सध्या शंभूराजे देसाई, हसन मुश्रीफ व सुरेश खाडे हे तिघे मंत्री आहेत.

तिघेही कॅबीनेट मंत्री आहेत. या पदासाठी कोरे, आवाडे, यड्रावकर, प्रकाश आबिटकर, सुधीर गाडगीळ व पडळकर हे इच्छूक आहेत. हातकणंगले लोकसभेचे खा. धैर्यशील माने यांच्या विजयात कोरे व आवाडे यांचा मोलाचा वाटा होता. त्यामुळे त्याचे बक्षीस दोघापैकी एकाला मिळण्याची चिन्हे आहेत.

नाराज धनगर समाजाला खुष करण्यासाठी पडळकर यांचा विचार होऊ शकतो. दुसऱ्यांदा निवडून आलेले आबिटकर हे मंत्रीपदाचे प्रमुख दावेदार होते. पण, लोकसभा निवडणुकीत त्यांच्या मतदार संघात विरोधकांना मोठे मताधिक्य मिळाले. यामुळे त्यांचे नाव मागे पडण्याची शक्यता जास्त आहे.

# अमोल मिटकरी दादांच्या बंगल्यावरील ऑपरेटर आहेत का?

**मुंबई :** अमोल मिटकरी यांच्या ट्विटनंतर खा. बजरंग सोनवणे म्हणाले की, अमोल मिटकरी कोण आहेत? ते अजित दादांच्या बंगल्यावरील ऑपरेटर आहेत का? कारण ऑपरेटरकडेच फोनचे रेकॉर्ड असते. माझ्या बीड जिल्ह्यातील जनतेने मला खूप प्रेम दिले आहे. माझ्या मनात जर काही पाप असेल तर मी घराच्या बाहेर पडताच बीड जिल्ह्यातील जनता मला चपलेने मारेल. पवार साहेबांना सोडायचे म्हटल्यावर तर माझे वडील मला कानसुलीत लगावतील. माझी बायको म्हणेल तुला खायला पण नाही, नाश्ता देखील नाही, अशी परिस्थिती होईल.

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीनंतर आता दुसरा पार्ट सुरु झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील शरद पवार आणि अजित पवार गटाबाबत आ. अमोल मिटकारी यांनी ट्विट केले आहे. या ट्विटनंतर राज्यातील राजकारणात भूकंप आला आहे. अमोल मिटकरी यांच्या दाव्यानुसार, बीडमधून विजय झालेले शरद पवार गटातील खासदार बजरंग सोनवणे यांनी अजित पवार यांना संपर्क करण्याचा प्रयत्न केला. अमोल मिटकरी यांचा बीडच्या बप्पाचा दादांना फोन या चार शब्दांच्या ट्विटनंतर राज्यातील राजकारणात भूकंप आला आहे. त्यावर खा. बजरंग सोनवणे यांनी बोलताना सर्व घडामोडी स्पष्ट केल्या आहेत.राजकारणाच्या पलीकडे काही विषय असतात, मात्र हे राजकारणावर का आणतात हे मला समजत नाही. अमोल मिटकरी आणखी एका ट्विटमध्ये म्हणतात, कारखाना अडचणीत असेल म्हणून हा निर्णय घेणार असल्याचे म्हटले आहे. परंतु एखाद्या अडचणीसाठी एवढा मोठा निर्णय मी घेणार नाही.

मला शरद पवारी, जयंत पाटील यांनी निवडणूक लढवण्यास सांगितले. मी त्या दोघांना शब्द दिला. त्यानंतर मी लढलो निवडून आलो. माझा कारखाना अडचणीत नाही. माझ्या कोणत्याही सभासदाला विचारुन घ्या. बीड जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना मागील १२ वर्षांपासून नियमित पैसे देत आहे. अमोल मिटकरी याचा ट्विट करण्याचा धनी किंवा त्याचा बोलविता धनी कोण आहे? हे अमोल मिटकरी यांनी सांगावे. विधानसभेत आमच्या २०० च्या वर जागा येतील.

महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे. हे मी जबाबदारीने सांगतो. मराठवाड्यात शंभर टक्के निकाल आम्ही देणार आहे. आता पक्ष जो माझ्यावर मराठवाडयातील विधानसभेची जबाबदारी देईल तेवढं मी पार पाडेन.

# वादळी पावसामुळे कोपरगाव तालुक्याला झोडपले

**अहमदनगर :** अर्ध्या कोपरगाव तालुक्याला मंगळवारी सायंकाळी वादळी पावसाने झोडपून काढले. अनेक घरांची पडझड झाली असून कांदाचाळींचे नुकसान झाले आहे. वेगवेगळ्या गावांमध्ये मोठमोठी वृक्ष मुळासकट उन्मळून पडली आहेत. तालुक्यात कुठेही जीवितहानी झालेली नाही.

मृग नक्षत्रावर पाऊस होत असल्याने एकीकडे समाधानाचे वातावरण असतानाच दुसरीकडे घरांची पत्रे उडून जाने, झाडे पडणे, विजेचे खांब वाकणे अशा घटना घडत आहेत.

कोळपेवाडी, सुरेगाव, कोळगावथडी, माहेगाव देशमुख, वारी, रवंदे, कोकमठाण व पोहेगाव आदी भागात मंगळवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह पाऊस झाला.

या पावसात सुरेगाव येथील दिनेश बोरा यांचे कांद्याचे शेड पूर्णपणे पडले. याच गावातील शैलेंद्र वाबळे यांच्या घराची पत्रे उडून गेल्याने नुकसान झाले आहे.

मौजे कोळगाव थडी येथील दगू निंबाळकर व भागवत निंबाळकर यांच्या घराशेजारी असलेले मोठे पिंपळाचे झाड घरावर पडून घराचे नुकसान झाले आहे.

यात सुदैवाने कुठल्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही.

# नाशिकमधून २२०० हज यात्रेकरू 'मक्का'मध्ये दाखल

## शुक्रवारपासून होणार यात्रेला प्रारंभ

**नाशिक :** इस्लामी कालगणनेचा शेवटचा महिना जिलहिज्जा हा हज यात्रेसाठी ओळखला जातो. पाच धार्मिक मूलस्तंभापैकी एक असलेल्या पवित्र हज यात्रेसाठी सौदी अरेबिया देशातील मक्का शहरातनाशिकजिल्ह्यातून २२०० हज यात्रेकरू पोहोचले आहेत. यामध्ये २० ते ३० वयोगटातील सहा युवती व दोन युवकांचाही समावेश आहे. यंदा एका यात्रेकरूला हज कमिटी ऑफ इंडियाच्या माध्यमातून ३ लाख ३६ हजार ३३० रुपये इतका खर्च आला आहे.

शारीरिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम असताना आयुष्यात एकदा तरी हज यात्रा करणे अनिवार्य असते. दरवर्षी सौदी अरेबियामधील मक्का-मदिना या दोन शहरांमध्ये ही तीर्थयात्रा पार पडते. जगाच्या कोनाकोपऱ्यातून मुस्लिमबांधव याठिकाणी दाखल होतात. यावर्षी भारतासाठी १ लाख ७५ हजार हज यात्रेकरूंचा एकूण कोटा सौदी सरकारकडून जाहीर करण्यात आला होता. त्यापैकी राज्यासाठी १९ हजार ६२४ यात्रेकरूंचा कोटा मिळाला होता. नाशिक शहरातून ४००, तर मालेगावातून १८०० यात्रेकरू सौदीमध्ये दाखल झाले आहेत. राज्यातून २६ मे पासून सौदी विमानांनी मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून सौदी विमानांचे उड्डाण सुरू होते. अखेरचे उड्डाण ९ जून रोजी झाले. येत्या शुक्रवारपासून (दि. १४) हज यात्रेला मक्का शहरात प्रारंभ होणार आहे.

रविवारी (दि. १६) तेथे सर्व यात्रेकरू बकरी ईद (ईद-उल-अज्हा) चे सामूहिक नमाजपठण करतील.

नाशिक शहरासह जिल्ह्यात सोमवारी (दि. १७) बकरी ईदचा सण साजरा करण्यात येणार आहे.

पाच महिन्यांपासून सुरू होती तयारीहज यात्रेची तयारी जानेवारी महिन्यापासून सुरू झाली होती. हज कमिटी ऑफ इंडियाद्वारे नाशिकमध्ये 'खादिमुल हुज्जाज' म्हणून हज यात्रेकरूंना मोईन खान, हामीद खान, नईम मुल्ला, मोबीन खतीब, गुलाम दस्तगीर, इम्तियाज शेख हे सेवा देत होते.

हज यात्रेसाठी इच्छुकांकडून अर्ज भरून घेणे, अर्जांची पडताळणी करणे, भाग्यवंत सोडत काढणे, यानंतर अंतिम यादीत निवड झालेल्या हज यात्रेकरूंकडून रक्कम जमा करणे, त्यांच्यासाठी प्रशिक्षण शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर राबविणे, लसीकरणाची व्यवस्था करणे, भारतीय रुपयांच्या मोबदलत्यात 'रियाल' हे सौदीचे चलन करून देणे, आदी बाबी या सर्व हज यात्रींच्या सेवेकऱ्यांच्या चमूने विना अडथळा पार पाडल्या. यामुळे यात्रेकरूंची होणारी गैरसोय टळली.

# पांडुरंग सदाशिव साने प्रेमाने साने गुरुजी म्हणून ओळखले जाणारे एक प्रसिद्ध मराठी साहित्यिक

शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड गावात झाला.

साने गुरुजींच्या लेखनातून अपार करुणा, देशभक्ती आणि मानवतावादी मूल्ये दिसून येतात. जीवन आणि समाजाविषयीची त्यांची प्रगल्भ अंतर्दृष्टी त्यांच्या साहित्यकृतींतून दिसून येते. त्यांचे आई-वडील सदाशिवराव आणि यशोदाबाई साने यांनी त्यांच्यामध्ये करुणा, देशभक्ती आणि मानवतावादाची तत्त्वे रुजवली. त्यांची आई यशोदाबाई यांनी त्यांच्या मूल्यांना आकार देण्यामध्ये विशेषत: महत्त्वाची भूमिका बजावली आणि आयुष्यभर त्यांचे मार्गदर्शक प्रकाश होते. त्यांच्या श्यामची आई या प्रसिद्ध कादंबरीत त्यांनी त्यांच्या आईने त्यांच्या जीवनात बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेचे सुंदर वर्णन केले आहे, तिला त्यांची दैवी प्रेरणा म्हणून चित्रित केले आहे.

साने गुरुजींच्या जीवनात शिक्षणाचा मोलाचा वाटा आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण पालगड गावात झाले आणि नंतर ते आपल्या मामाच्या मार्गदर्शनाखाली पुढील शिक्षणासाठी पुण्याला गेले. आर्थिक अडचणींचा सामना करूनही त्यांनी आपले शिक्षण चालू ठेवले.

अखेरीस न्यू पूना कॉलेज (आता सर परशुराम कॉलेज, पुणे म्हणून ओळखले जाते) मधून पदवी आणि पदव्युत्तर पदवी मिळविली. लहानपणापासूनच साहित्य आणि कवितेची आवड दाखवून त्यांनी मराठी आणि संस्कृतमध्ये प्राविण्य मिळवले.

साने गुरुजींच्या सामाजिक आणि आर्थिक संघर्षांच्या सुरुवातीच्या अनुभवांनी त्यांच्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन खोलवर प्रभाव पाडला. त्यांनी उपेक्षितांच्या दुर्दशेबद्दल सहानुभूती दर्शवली आणि सामाजिक न्याय आणि समानतेचा पुरस्कार केला. महात्मा गांधी आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रेरणेने त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला आणि भारत छोडो आंदोलनात तुरुंगवास भोगला.

एक विपुल लेखक म्हणून साने गुरुजींनी साहित्य, तत्त्वज्ञान, सामाजिक समस्या आणि अध्यात्म यासह विविध विषयांवर सुमारे ७३ पुस्तके लिहिली. त्यांच्या साहित्यकृतींनी अनेकदा निसर्ग साजरे केले आणि पर्यावरणाशी सुसंवाद साधला. त्यांच्यावर गांधीवादी तत्त्वांचा खूप प्रभाव होता आणि त्यांनी त्यांच्या लेखनातून राष्ट्रीय विचारांना प्रोत्साहन दिले.

वैयक्तिक आव्हाने आणि आरोग्याच्या समस्यांना तोंड देत असतानाही साने गुरुजी राष्ट्रसेवा आणि दीनदुबळ्यांच्या उन्नतीसाठी समर्पित राहिले. सत्य आणि न्यायाच्या त्यांच्या अथक प्रयत्नामुळे त्यांना सर्व स्तरातील लोकांची प्रशंसा मिळाली.

दु:खाची गोष्ट म्हणजे ११ जून १९५० रोजी साने गुरुजींचे आकस्मिक आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनानंतर सात दशकांनंतरही त्यांचा वारसा पिढ्यांना प्रेरणा देत आहे आणि ते राष्ट्रीय प्रतीक आणि आदरणीय शिक्षक म्हणून स्मरणात आहेत.


मराठी साहित्य समृद्ध करणारे आणि वाचकांना प्रेरणा देणारे साने गुरुजींचे साहित्यिक योगदान अमूल्य आहे. त्यांची कामे सामाजिक बदल प्रज्वलित करण्यासाठी आणि मानवतेमध्ये एकता आणि करुणेची भावना वाढवण्यासाठी साहित्याच्या सामर्थ्याचे अखंड स्मरण म्हणून काम करतात.

### भाजपामधील मैत्री जपणारी पिढी संपली : मनसेची टीका

**मुंबई :** मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनविण्यासाठी महायुतीला बिनशरथ पाठिंबा देणारे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांना शपथविधी समारंभाचे निमंत्रण न दिल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने भारतीय जनता पक्षाला टोला लगावला आहे. भाजपामधील मैत्री निभावणारी पिढी संपुष्टात आल्याची टीका मनसेचे नेते प्रकाश महाजन यांनी केली आहे.

लोकसभा निवडणुकीत कोणतीही अट न घालता मनसेने महायुतीला पाठिंबा दिला. पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी महायुतीच्या अनेक उमेदवारांसाठी प्रचार सभा घेतल्या आणि ते उमेदवार निवडूनही आले. आमच्या कार्यकर्त्यांनी महायुतीच्या प्रचारासाठी कष्ट घेतले. त्यामुळे आमच्या नेत्यांना शपथविधीच्या समारंभाचे निमंत्रण असते तर आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना आनंद झाला असता. मात्र गरज असताना दाराचे उंबरठे शिजवायचे आणि काम झाल्यावर दार बंद करायचे, या वृत्तीचे परिणाम लोकसभा निवडणुकीत दिसून आले आहेत.

# बारामतीची जागा अपक्ष १ हजार टक्के जिंकली असती; विजय शिवतारेंचं विधान



**बारामती :** बारामती लोकसभा मतदारसंघाची यावेळी देशभरात चर्चा झाली. या मतदारसंघात पवार विरुद्ध पवार अशीच लढत होती. महाविकास आघाडीकडून सुप्रिया सुळे तर महायुतीकडून अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी निवडणूक लढली. या मतदारसंघातूनशिवसेनानेतेविजय शिवतारेयांनीही निवडणूक लढण्याची इच्छा व्यक्त केली होती. पण, नंतर त्यांनी माघार घेतली. दरम्यान, आता निकालानंतर शिवतारे यांनीबारामतीमतदारसंघाबाबत मोठं विधान केलं आहे.

मित्रपक्षानं महायुतीची साथ सोडली; विधानसभेला स्वबळावर २० जागा लढण्याची घोषणालोकसभा निवडणुकीची चर्चा सुरू झाली होती तेव्हा शिवसेना नेते विजय शिवतारेयांनी निवडणूक लढवणार असं जाहीर केलं होतं. यावेळी राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाल्या होत्या. नंतर काही दिवसांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मध्यस्ती करुन शिवतारे यांना माघार घ्यायला सांगितली. दरम्यान, आता शिवतारे यांनी निवडणूक निकालावर भाष्य केलं आहे. टीव्ही नाईन या वृत्तवाहिनेला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी बारामती लोकसभेवर भाष्य केलं आहे.महायुतीची जागा निवडून यावं असं सगळ्यांचं मत होतं, मी त्यावर बोलणार नाही. मी ही जागा १ हजार टक्के अपक्ष म्हणून जिंकली असती. कारण या दोघांनाही किती विरोध होता हे मला माहित होतं. इथं पक्ष नाही, इथे दोन प्रकारचे मत प्रवाह आहेत.

एक पवार प्रो. आणि एक पवार विरोधी, लोकांना यांनाही आणि त्यांनाही मतदान करायचं नव्हतं, असंही विजय शिवतारे म्हणाले.

पवार साहेबांनी कोणाचही ऐकून बोलायला नकोखासदार शरद पवार यांनी उपस्थित केलेल्या जमिनीच्या मुद्द्यावर बोलताना विजय शिवतारे म्हणाले, कोणाचही ऐकून जाहीर स्टेटमेंट देत असतील तर माझ्याकडे भरपूर माहिती आहे, पण मी तुमचा आदर करतो. तुम्ही कोणाचही ऐकून नका ना बोलू. विजय शिवतारेने जे काही केलं आहे ते सगळ्यांना माहित आहे. मी सगळं उघड-उघड केलं आहे, असंही शिवतारे म्हणाले.



# झाडानी येथील अनधिकृत बांधकामावर कारवाई करा

## जिल्हा प्रशासनाचे वाई प्रांताधिकाऱ्यांना पत्र

**सातारा :** झाडानी, ता. महाबळेश्वर येथे जीएसटी आयुक्त चंद्रकांत वळवी आणि त्यांच्या नातेवाइकांनी ६४० एकर जमिनीचा व्यवहार केला आहे. याठिकाणी ४० एकरांमध्ये अनधिकृत बांधकाम करण्यात आले असून, कारवाई करावी आणि त्याचा अहवाल तत्काळ सादर करावा, असे आदेश निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांनी दिले आहेत.

झाडानी येथील ग्रामस्थांची दिशाभूल करून जीएसटी आयुक्त चंद्रकांत वळवी आणि त्यांच्या नातेवाइकांनी गावातील ६४० एकर जमिनीचे व्यवहार केल्याचा आरोप करून याठिकाणी ४० एकरांत अनधिकृत बांधकाम आणि कमाल जमीन धारणा कायदा उल्लंघनप्रकरणी कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरे यांनी केली होती. तसेच याप्रकरणी विविध ठिकाणी तक्रारीही केल्या होत्या. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी वाई प्रांताधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली. चौकशी समितीचा अहवाल आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी चंद्रकांत वळवी यांच्यासह तिघांना नोटीस बजावून ११ जूनला कागदपत्रांसह लेखी म्हणणे सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यात कमाल जमीन धारणाचा उल्लेख होता.

त्यानुसार दि. ११ रोजी सुनावणी होऊन आता दि. २० जूनला सुनावणी होणार आहे. तथापि, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांनी वाई प्रांताधिकाऱ्यांना झाडानी येथील ६२० एकरांपैकी ४० एकरांत झालेल्या अनधिकृत बांधकामप्रकरणी पत्र पाठवले आहे.

यामध्ये वाई प्रांतांच्या अहवालानुसार झाडानीतील ४० एकरांत अनधिकृत बांधकाम झाल्याचे दिसून येत आहे.

या बांधकामावर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील ४५ अन्वये नियमानुसार कारवाई करावी आणि केलेल्या कारवाईचा अहवाल तत्काळ सादर करावा, असे आदेश दिले आहेत.

दरम्यान, सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील बफर व संवेदनशील क्षेत्रातील जंगलतोड, खाणकाम, बांधकाम, खोदकाम तसेच कोअर क्षेत्रातील वेळे, देऊर, मळे, कोळणे, पाथरपुंज, खिरखिंडी, गोठणे, कुंडी, खुंदलापूर, आदी गावांचा पुनर्वसनाचा प्रश्न, बफर क्षेत्रातील १८ नागरी सुविधा, व्याघ्र प्रकल्पातील बफर क्षेत्रातील जमीन खरेदी व्यवहारांची चौकशी करणे, कांदाटी खोऱ्यातील १६ गावांसाठी रुग्णवाहिका सेवा, नवजा (ता. पाटण) येथील ओझर्डे धबधब्याचे व्यवस्थापन स्थानिक जनवन समितीकडे द्यावे, हिंस्र वन्यजिवांच्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर लोकांना तत्काळ मदत, वासोटा किल्ला, ओझर्डे धबधबा परिसरात प्लास्टिक संकलन केंद्राची उभारणी, आदी मागण्या मोरे यांनी उपोषणादरम्यान केल्या होत्या. या मागण्यांबाबत कार्यवाही होत असल्याची माहिती मोरे यांनी दिली.

# सततच्या पावसामुळे भाताच्या रोपांचे नुकसान

## कोपर्डे हवेली परिसरातील चित्र

**कोपर्डे हवेली :** कोपर्डे हवेली परिसरात भात पेरणीच्या तुलनेत भाताची रोपांची लावण केली जाते. त्यासाठी रोहिणी नक्षत्राच्या दरम्यान रोपे तयार करण्यासाठी भाताचे बियाणे वाफे करून टाकले होते; पण गेल्या आठवड्यापासून पडत असलेल्या सततच्या पावसामुळे उगवण झालेले तरवाची मुळे कुजल्याने नुकसान झाले असून, रोपांची टंचाई निर्माण होणार असल्याचे चित्र सध्या कोपर्डे हवेली परिसरातील शिवारात दिसत आहे.

कोपर्डे हवेली परिसर हा बागायती म्हणून ओळखला जातो. ऊसापाठोपाठ भाताचे क्षेत्र जादा असते. शेतकरी बाजारपेठत इंद्रायणी तांदळाला चांगली मागणी असल्याने जादा उत्पादन खर्च करून जादा उत्पादन घेतात. भाताच्या तरवे स्वत: तयार करून त्याची लावण करतात त्यासाठी भाताचे तरवे रोहिणी नक्षत्राच्या दरम्यान टाकतात. यंदाही भाताची रोपे लावणीसाठी अनेक शेतकऱ्यांनी तरवे टाकले होते. त्यासाठी वाफे तयार करून सेंद्रिय खत टाकून भाताची टोकण केली होती.

तरवे जोमदार आले होते. गेल्या आठ दिवसांपासून सतत पडत असलेल्या पावसामुळे रोपांना मुळे कुजवा झाल्याने काही शेतकऱ्यांचे तरवे वाया गेले आहे. काही शेतकऱ्यांचे तरवे चांगले असले तरी तुलनेत परिसरात भात लावणीचे क्षेत्र जादा असल्याने भात रोपांची टंचाई जाणवणार असल्याचे शेतकरी बोलत आहेत.



**इंद्रायणी सुवासिक नवीन वाणाचे बियाणे भात रोपे तयार करण्यासाठी टाकले होते. सततच्या पावसामुळे रोपांना मुळे कुजवा झाला असल्याने यातील थोड्याच रोपांची लावण करता येणार आहे. रोपांच्या टंचाईमुळे रोपांची किंमत वाढणार आहे.**

**- विक्रम चव्हाण, शेतकरी, कोपर्डे हवेली**

# शालेय पोषण आहारात यंदापासून १५ लज्जतदार पदार्थ

**कोल्हापूर :** व्हेजिटेबल पुलाव, अंडा पुलाव, मटार पुलाव, मूगडाळ खिचडी, गोड खिचडी, नाचणीचे सत्त्व, मोड आलेले कडधान्य, मसुरी पुलाव आणि केळी किंवा स्थानिक फळ ही नावे वाचून हॉटेलमध्ये जेवणासाठी गेलेल्या ग्राहकांनी मागावलेल्या अन्नपदार्थांची यादी असेल असे वाटेल. पण राज्य शासनाने शालेय पोषण आहारासाठी शाळांना सुचवलेल्या पदार्थांची. केवळ खिचडी, वरण-भात, उसळ भात अशा मर्यादित खाद्यापदार्थांऐवजी यंदापासून १५ लज्जतदार पदार्थांची चव ८६ हजार ५०० शाळांमधील १ कोटी ३ लाख विद्यार्थ्यांना चाखता येणार असल्याने त्यांची ज्ञानाच्या जोडीनेच अन्नाची गोडी वाढणार आहे.

या योजनेमध्ये स्थानिक अन्नधान्य, तृणधान्य व अन्य पदार्थांचा समावेश करण्यात आला आहे. राज्याच्या शिक्षण विभागाने याबाबतचे नवे धोरण नुकतेच जाहीर केले आहे. त्यामध्ये तांदूळ, डाळी, कडधान्यापासून तयार केलेले आहार, मोड आलेले कडधान्य (स्प्राउट्स) आणि गोड पदार्थ म्हणून तांदळाची खीर, नाचणी सत्त्व याचा समावेश केला आहे.

# बांगलादेशी घुसखोरांचे लोकसभेसाठी मतदान; मुंबईत धरपकड

**मुंबई :** बांगलादेशी नागरिकांची बेकायदा घुसखोरी ही देशासमोरील गंभीर समस्या आहे. न्यायालयाने परतीसाठी जामीन मंजूर केल्यानंतरही हे घुसखोर बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतीय ओळख मिळवून राहत असल्याचे समोर आले आहे. महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) मुंबईच्या वेगवेगळ्या भागांतून चार बांगलादेशी घुसखोरांना अटक केली आहे. या घुसखोरांनी तसेच इतर काही बांगलादेशींनी भारतीय नागरिक म्हणून नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत मतदान केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.

बांगलादेशातून भारतात घुसखोरी करून राहणाऱ्या बांगलादेशी नागरिकांविरुद्ध एटीएस तसेच इतर यंत्रणा विविध मोहीम हाती घेत असतात. त्यातच न्यायालयाने जामीन दिल्यानंतरही मायदेशी परतण्याऐवजी काही बांगलादेशी मुंबई, महाराष्ट्रात वास्तव्य करून राहत असल्याची माहिती एटीएसला मिळाली. या माहितीची शहानिशा करण्यासाठी एटीएसच्या जुहू युनिटच्या पथकाने मुंबईच्या अंधेरी, जोगेश्वरी, मालाड, माहुल गाव येथून चार बांगलादेशी नागरिकांची धरपकड केली. त्यांच्या चौकशीमध्ये आणखी काही बांगलादेशी असेच बेकायदा वास्तव्य करून राहत असल्याची माहिती मिळाल्याचे एटीएसच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. गुजरातच्या सुरत येथील वास्तव्याचे त्यांच्याकडे पुरावे सापडले.

हे सर्व पुरावे आणि ओळखपत्रे त्यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे बनविल्याचे उघडकीस आले आहे. न्यायालयाने या चौघांची रवानगी पोलिस कोठडीत केली आहे.

बनावट भारतीय ओळख मिळवणाऱ्या या बांगलादेशींचे केवळ भारतातच वास्तव्य नसून ते या ओळखीचा वापर विदेशात नोकरीसाठीही करीत आहेत. अटक केलेल्या आणि चौकशीमध्ये रडारवर आलेल्या पाच बांगलादेशींनी बनावट कागदपत्रांवर भारतीय पासपोर्ट मिळवले आहेत. एक बांगलादेशी नागरिक तर या पासपोर्टवर सौदी अरेबियामध्ये जाऊन नोकरी करीत असल्याचे एटीएसने म्हटले आहे. भारतीय असल्याचे सिद्ध करण्यासाठी तसेच भारतीय पासपोर्टवर विदेशात नोकऱ्या मिळणे शक्य असल्याने ते भारतीय पासपोर्ट प्राप्त करतात, असे निदर्शनास आले आहे.

## काँग्रेसचे सत्संग नारायणराव मुंडे पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबीत

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीत पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस सत्संग नारायणराव मुंडे यांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या निर्देशाने काँग्रेस पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबीत करण्यात आले आहे.

प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे यांनी ही माहिती दिली आहे.

## शेतकऱ्याला केंद्रबिंदू मानून सुविधा निर्माण करा : मंत्री अब्दुल सत्तार

**मुंबई :** शेतकऱ्याला केंद्रबिंदू मानून शेतकऱ्यांसाठी पणन विषयक सुविधा निर्माण कराव्यात, अशा सूचना पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी दिल्या. महाराष्ट्र राज्य कृषी उत्पादन मंडळाच्या १५२ व्या संचालक मंडळाची सभा पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडली. सदर बैठकीमध्ये पणन मंत्री सत्तार यांनी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या कामकाजाचा आढावा घेतला.

महाराष्ट्र राज्य पणन मंडळातर्फे बापगाव, काळडोंगरी, छत्रपती संभाजीनगर तळेगाव दाभाडे तसेच सिल्लोड श्रीरामपूर येथे उभारण्यात येणाऱ्या नियोजित प्रकल्पांचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. याशिवाय काजू बोर्ड, आंबा बोर्ड, शासन अनुदानित नागपूर जिल्ह्यातील नागपूर, काटोल, कळमेश्वर, अमरावती जिल्ह्यातील मोर्शी, बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर येथे उभारण्यात येणा-या संत्रा प्रकल्पांचे कामकाज याचा आढावा घेण्यात आला.

आंबा उत्पादकांसाठी रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी सिंधूरत्न योजनेतून उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या कुलिंग व्हॅन, स्मार्ट प्रकल्पातून निर्माण करण्यात येणाऱ्या पणन विषयक सुविधा, ई-नाम योजनेत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या १५ बाजार समित्यांबाबत ई- नाम योजनेनुसार पुढे करावयाची कार्यवाहीबाबत सद्यस्थितीची माहिती सत्तार यांनी यावेळी दिली.

सिल्लोड तालुक्यातील उत्पादित होणाऱ्या मिरचीचे उत्पादन व गुणवत्ता विचारात घेऊन तेथे मिरचीसाठी सुविधा केंद्र निर्माण करावे,

दोन जिल्हा मिळून पणन मंडळाचे एक उपविभागीय कार्यालय करावे, तळेगाव दाभाडे येथील प्रक्षेत्रावरील कन्व्हेंशन सेंटरचे काम जलद गतीने पूर्ण करावे तसेच तळेगाव येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे फुल लिलाव केंद्र निर्माण करावे, अशा सूचना सत्तार त्यांनी यावेळी दिली. सदर बैठकीस पणन मंडळाचे संचालक प्रवीण कुमार नहाटा, चरणसिंग ठाकूर, केंद्र शासनाचे प्रतिनिधी भवेश कुमार जोशी, कार्यकारी संचालक संजय कदम आदी उपस्थित होते.

## जलजीवन मिशनची कामे कालमर्यादेत पूर्ण करावीत : पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील

**मुंबई :** राज्यातील ग्रामीण भागात प्रत्येक कुटुंबाला पाणी देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. यामुळे 'हर घर नलसे जल' या उद्देशाने प्रत्येक कुटुंबाला पाणी मिळण्यासाठी राज्यात सुरू असलेली जलजीवन मिशनची कामे कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी आज दिले. मंत्रालयातील दालनात राज्यातील जलजीवन मिशनबाबत आढावा बैठकीत मंत्री पाटील बोलत होते. यावेळी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, जलजीवन मिशनचे अभियान संचालक ई.रवींद्रन, सहसंचालक श्रीकांत अनारसे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे मुख्य अभियंता सुभाष भुजबळ,आदी उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले, राज्यातील ग्रामीण जनतेला पाणीटंचाई भासू नये, यासाठी जिल्हा परिषद आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत जलजीवन मिशन सुरू करण्यात आले आहे. राज्यातील १ कोटी ४६ लाख ७१ हजार ९१८ कुटुंबापैकी १ कोटी २५ लाख ९८ हजार १९५ कुटुंबांना नळ जोडणी देऊन पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. शाळा, अंगणवाड्यांनाही ९९ टक्के नळजोडणी देण्यात आली आहे. जलजीवन मिशनचे सुधारित प्रस्ताव त्वरित पाठविण्याच्या सूचनाही श्री. पाटील यांनी यावेळी केल्या. शिवाय राज्यभरातून सुधारित प्रस्तावासाठी आणि कामे मिशन मोडवर पूर्ण होण्यासाठी प्रत्येक विभागांतर्गत शिबीरे आयोजित करावीत.

अमरावती, सिंधुदुर्ग जिल्ह्यासह अन्य जिल्ह्यात जिथे निधीची कमतरता आहे, तिथे त्वरित निधी वितरित करावा. जिल्हा परिषदस्तरावर कामे वेगाने होण्यासाठी गट स्थापन करावेत. येत्या एक महिन्यामध्ये योजनेला गती देण्याचे निर्देशही मंत्री पाटील यांनी दिले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासाठी ज्या जिल्ह्यांची निधीची मागणी आहे, त्यांना निधी देण्यात येणार असून महिन्याभरात कामांना सुरळितपणा आणण्याची ग्वाही प्रधान सचिव खंदारे यांनी दिली. राज्यात यावर्षी आतापर्यंत १ लाख ५२०६ नळजोडणी केली तर १७२२१ गावे हर घर जल म्हणून घोषित केल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## शक्तीपीठ महामार्ग पूरपट्ट्यातून असल्याने पूरधोका वाढणार

**सांगली :** प्रस्तावित शक्तीपीठ महामार्ग सांगलीजवळच्या पूरपट्ट्यातून जात असल्याने याची गांभीर्याने दखल घेउन भरावामुळे सांगलीला महापूराचा धोका अधिक असल्याचे संबंधित प्रशासकीय यंत्रणेच्या नजरेस आणावे अशी सूचना बुधवारी झालेल्या आपत्ती निवारण समितीच्या बैठकीत कार्यकर्त्यांनी केली.संभाव्य पूरस्थितीला सामोरे जाण्यासाठी आणि करायच्या विविध योजनाबाबत चर्चा करण्यासाठी आयुक्त शुभम गुप्ता यांनी आज सामाजिक संस्था व कार्यकर्ते यांची बैठक बोलावली होती. महापूर स्थिती उद्भवल्यास तातडीने कोणती पावले उचलावीत यावर यावेळी कार्यकर्त्यांनी सूचना मांडल्या.

यावेळी कॉ. उमेश देशमुख यांनी शक्तीपीठ महामार्गाच्या भूसंपादनाबाबत कालच प्रसिध्द झालेल्या शासनाच्या अधिसूचनेचा उल्लेख करत सांगितले, प्रस्तावित महामार्ग माधवनगरच्या पश्चिम भागातून कर्नाळ, पद्माळे, सांगलीवाडी या परिसरातून जाणार आहे. या महामार्गासाठी भराव टाकण्यात आल्यानंतर कृष्णेचे विस्तारित होणारे पाणी निचरा होण्यासाठी अल्प संधी मिळणार असून यामुळे विस्तारित भागालाही महापूराचा धोका निर्माण होणार आहे. याची माहिती संबंधित यंत्रणेला महापालिकेने उपलब्ध करून द्यावी. वस्तुस्थिती दर्शवून प्रस्तावित महामार्गाचे आरेखन कसे आहे याची तज्ज्ञांमार्फत तपासणी करावी अशी सूचना मांडली.

दरम्यान, जिल्ह्यातील कवठेमहांकाळ, मिरज आणि तासगाव तालुक्यातून शक्तीपीठ महामार्ग प्रस्तावित असून तशी अधिसूचना मंगळवारी प्रसिध्द करण्यात आली आहे. या अधिसूचनेवर २१ दिवसात सूचना हरकती नोंदवायच्या आहेत. या महामार्गामुळे सुमारे पाच हजार शेतकरी बाधित होणार आहेत. या महामार्गाला विरोधही होत आहे. संघटित विरोध करण्यासाठी दोन दिवसात बैठकीचे आयोजन करण्यात असल्याचे दिगंबर कांबळे आणि कॉ. देशमुख यांनी सांगितले.


## जुलैपर्यंत १०० टक्के गावे हागणदारीमुक्त करावी : पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील

**मुंबई :-** स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा - २ चा मुख्य उद्देश संपूर्ण राज्य २०२४-२५ पर्यंत हागणदारीमुक्त करणे हा आहे. या अभियानाअंतर्गत ग्रामीण भागातील ३३ हजार ९४७ गावे हागणदारी मुक्त झाली असून, ६ हजार ५२८ गावे जुलैपर्यंत हागणारी मुक्त करण्यासाठीची कार्यवाही तातडीने राबविण्यात यावी. स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत येणारी कामे कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी मंत्री पाटील यांनी दिले.

आज मंत्रालयात स्वच्छ भारत अभियान ग्रामीण टप्पा - २ च्या कामकाजाचा आढावा आज पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी मंत्रालयात घेतला. यावेळी प्रधान सचिव संजय खंदारे, सहसचिव तथा अभियान संचालक शेखर रौंदळ, अवर सचिव चंद्रकांत मोरे, स्मिता राणे आदीसह अधिकारी उपस्थित होते. मंत्री पाटील म्हणाले की, हागणदारीमुक्त अधिक मॉडेल गावे १४ हजार ९०७ असून, उर्वरित २५ हजार ५६६ गावे मॉडेल बनविण्यासाठी, वैयक्तिक शौचालय बांधकाम प्रगतीतील एक लाख १२ हजार शौचालयांचेही बांधकाम, तसेच सार्वजनिक शौचालय बांधकाम अंतर्गत १ लाख २१ हजार बांधकामे कालमर्यादेत पूर्ण करावीत. तसेच ज्या कामांसाठी निधी केंद्र शासनाकडून प्राप्त होतो, त्या बांधकामांच्या निधीसाठी केंद्र सरकारकडे निधीसाठी प्रस्ताव सादर करावा.

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत जिल्ह्याकडून ट्रायसायकल व बॅटरी ऑपरेटेड ट्रायसायकलची मागणी प्राप्त करून घेण्याची कार्यवाही जलदगतीने पूर्ण करावी. कचरा विलगीकरण केंद्र, गोबरधन प्रकल्प प्रगती, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन प्रकल्प प्रगती, सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प प्रगती, मैला गाळ व्यवस्थापन, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत कामांचा यावेळी मंत्री पाटील यांनी आढावा घेतला.

## नाशिकरोड परिसरातील वीज पुरवठा तीन दिवसांपासून खंडित : शहरातील अनेक भागात विजेचा लपंडाव



**नाशिक :** शहर परिसरातील काही भागात वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना वेगवेगळ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. नाशिक रोड, एकलहरे परिसरात रविवारी मध्यरात्रीपासून खंडित झालेला वीज पुरवठा बुधवारी सायंकाळपर्यंत सुरळीत होऊ शकला नाही. गुरुवारी सायंकाळपर्यंत वीज पुरवठा सुरळीत होण्याची शक्यता आहे.


शहर परिसरात विजेचा तुटवडा जाणवण्यास सुरूवात झाली आहे. अनेक भागात रोहित्रांवर जादा भार आल्याने, काही तांत्रिक अडचणीमुळे विद्युत पुरवठा खंडित होत आहे. बुधवारी आकाशवाणी केंद्र, गंगापूर रोड परिसर, पंचवटी, सिडकोसह अन्य भागात दिवसभर विजेचा लपंडाव सुरू होता. विद्युत पुरवठा नसल्याने नागरिकांना वेगवेगळ्या अडचणींना तोंड द्यावे लागले. बँकांचे आर्थिक व्यवहार ठप्प झाले. विजेवरील रसवंत्या बंद राहिल्या. व्यावसायिकांनी वीज नसल्याने दुकाने बंद ठेवल्याने बाजारपेठेतही शुकशुकाट राहिला.

दरम्यान, महापारेषणच्या एकलहरे येथील विद्युत उपकेंद्रातील एकापाठोपाठ एक तीन रोहित्रातील बिघाडामुळे महावितरणची उपकेंद्रे प्रभावित होऊन नाशिकरोड भागातील नागरिकांना अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. वीज व्यवस्थेतील बिघाडाचा त्रास सामनगाव, दसक, राजराजेश्वरी मंगल कार्यालय, जेलरोड, नाशिकरोड, देवळीगाव, भगूर, शिंदे, पळसे, चेहडी, उपनगर आणि लगतच्या परिसरातील ४० हजारांहून अधिक ग्राहकांना होत आहे.

प्रभावित झालेल्या क्षेत्राला ७० मेगावॉट वीज लागते. सध्या पर्यायी मार्गाने ४० मेगावॉट विजेची व्यवस्था केली जात असून अद्याप ३० मेगावॉट विजेचा तुटवडा आहे. यासाठी मंगळवारी सायंकाळी या ठिकाणी नवे रोहित्र बसविण्यास सुरूवात झाली. बुधवारी सायंकाळी उशीरापर्यंत हे काम सुरू होते. चक्राकार पध्दतीने विद्युतपुरवठा होत आहे. मात्र पुढील दोन दिवसांत विद्युत पुरवठा सुरळीत होईल असा दावा महावितरणच्या अधिकाऱ्यांनी केला.

## सोलापूर जिल्ह्यात दमदार पावसाने नदी, नाल्यांना पाणी

**सोलापूर :** मृग नक्षत्राला सुरूवात झाल्यापासून सोलापूर जिल्ह्यात दररोज पावसाच्या दमदारी सरी कोसळत आहेत. बुधवारी सकाळी संपलेल्या २४ तासांत सरासरी ३०.१ मिलीमीटर पाऊस झाला असून माढा व बार्शीसह उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, करमाळा आदी भागात पावसाचा जोर दिसून येतो. या पावसामुळे नदी, नाले, ओढे दुथडी भरून वाहात आहेत. मात्र दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव येथे ओढ्यावरील पुलावर वाढलेल्या पाण्याच्या प्रवाहात तिघेजण वाहून गेले. सुदैवाने त्यापैकी दोघे बचावले असून तिसरा तरूण बेपत्ता आहे. बार्शीजवळ ओढा वाहून गेल्यामुळे त्या भागातील संपर्क तुटला आहे. तर दुसरीकडे अक्कलकोटमध्ये कुरनूर धरणात पाण्याचा प्रवाह येऊ लागल्याने तेथील शेतक-यांना दिलासा मिळाला आहे.



सोलापूर शहरात रात्रभर पावसाने दमदार हजेरी लावली असून २४ तासांत ५६.६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. माढा-५८.२, बार्शी-४६.१, उत्तर सोलापूर-४०.४, मोहोळ-३५.३, करमाळा-३४.७, दक्षिण सोलापूर-३२.७,पंढरपूर-२२.९, अक्कलकोट-२२.३, माळशिरस-१९, सांगोला-१६.३, मंगळवेढा-१३.३ याप्रमाणे तालुकानिहाय कमीजास्त पडलेल्या पावसाची आकडेवारी आहे. जिल्ह्यात गेल्या आठवडाभरात सरासरी १८०.७ मिमी पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात एकाच दिवशी सर्वाधिक ८५.८ मिमी पाऊस माढा तालुक्यातील रांझणी तर याच तालुक्यातील दारफळ या मंडळात ८४. ५ मिमी पाऊस बरसला. याच तालुक्यात कुर्डूवाडीत ७९.५, तर म्हैसगाव मंडळात ६३.८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. कोर्टी (करमाळा) व सुर्डी (बार्शी) येथे प्रत्येकी ७२ तर खांडवी (बार्शी) मंडळात ६९ मिमी पाऊस बरसला. दक्षिण सोलापूर तालुक्यात बोरामणीत ५६.८ तर मुस्ती येथे ५२ मिमी पाऊस झाला. मार्डी (उत्तर सोलापूर)-५७, करकंब (पंढरपूर)-५२, शेटफळ-५२, नरखेड-४७ (ता. मोहोळ) आदी मंडळांमध्ये पावसाचा विशेष जोर होता.

जिल्ह्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान ४८८.८३ मिमी आहे. मागील पाच वर्षातील वार्षिक पर्जन्यमानाची स्थिती पाहता २०१९ साली ३३२.६२, २०२० साली ५४४.३२, २०२१ साली ५४१.७०, २०२२ साली ५२६.६ आणि मागील २०२३ साली ३६८.३८ वार्षिक पर्जन्यमानाची माहिती जिल्हा प्रशासनाकडून उपलब्ध झाली आहे.

**ओढ्यात तिघे वाहून गेले**

सोलापूर शहर व जिल्ह्यात पडणा-या दमदार पावसामुळे नदी, नाले, ओढ्यांना पाणी आले आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव येथे रात्री धो धो पडलेल्या पावसामुळे औढ्यावरील पूल पाण्याखाली गेला. पुलावर पाण्याचा प्रवाह असताना दुचाकीवर बसून ओढ्यावरील पूल ओलांडताना तिघे तरून पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले. सुदैवाने त्यातील बबन संदीपान जाधव आणि महेदेव रेड्डी हे दोघे बचावले. मात्र ज्ञानेश्वर संभाजी कदम हा बेपत्ता असून त्याचा शोध दुस-या दिवशी सायंकाळपर्यंत लागला नव्हता. त्याची दुचाकी मात्र सापडली आहे.

# झोपेत असतानाच इमारतीला लागली आग

## कुवेतमध्ये ४० भारतीयांचा होरपळून मृत्यू



दक्षिण कुवेतमध्ये एका इमारतीला लागलेल्या भीषणआगीत४० भारतीयांचा मृत्यू झाला. या भीषणआगीतइमारत पूर्णपणे जळून खाक झाली. ज्या इमारतीला आग लागली त्या इमारतीत मजूर राहत होते. त्यातील बहुसंख्य हे भारतीय होते. या घटनेनंतर पंतप्रधाननरेंद्र मोदीयांनी शोक व्यक्त करत परराष्ट्र मंत्र्यांना कुवेतला जाण्याचे आदेश दिले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. या घटनेत काही लोकांचा मृत्यू आगीमुळे झाला. तर धुरामुळे गुदमरून मोठ्या प्रमाणात लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती स्थानिक माध्यमांनी दिली आहे.-ऊाएठढखडएचएछढकुवेतमध्ये एका बहुमजली इमारतीला लागलेल्या आगीत ४० भारतीय नागरिकांसह ४१ लोकांचा मृत्यू झाला, तर ३० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. अल-मंगफ नावाच्या इमारतीत ही आग लागली. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल सांगितले की मृतांमध्ये बहुतांश भारतीय नागरिक आहेत. पंतप्रधाननरेंद्र मोदीयांनी या घटनेवर शोक व्यक्त केला आहे. स्थानिक वेळेनुसार बुधवारी पहाटे चारच्या सुमारास ही भीषण आग लागली. ज्या इमारतीला आग लागली त्या इमारतीत मोठ्या संख्येने भारतीय मजूर राहत होते.या घटनेनंतर भारत सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आदेशानंतर परराष्ट्र राज्यमंत्री कीर्तीवर्धन सिंह कुवेत दौऱ्यावर रवाना झाले आहेत. आगीच्या घटनेत जखमी झालेल्यांना मदतीची देखरेख करण्यासाठी आणि मृतांचे मृतदेह त्वरीत परत आणण्यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्यासाठी परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री कीर्तीवर्धन सिंह तात्काळ कुवेतला रवाना झालेत.पहाटे चार वाजता मजूर झोपलेले असताना आग लागल्यानेअपघातातीलमृतांचा आकडा वाढला.

अचानक लागलेल्या आगीमुळे लोकांना पळून जाण्याची संधी मिळाली नाही आणि झोपेतच त्यांचा जीव गुदमरला. ही इमारत एनबीटीसी ग्रुप नावाच्या कंपनीने घेतली असून त्यात १९५ कामगार राहत होते. यातील बहुतांश लोक हे केरळ, तामिळनाडू आणि काही उत्तर भारतीय राज्यांतील होते.कुवेतमधील कामगारांच्या इमारतीला लागलेल्या भीषण आगीत केरळवासीयांसह ४० हून अधिक भारतीयांचा मृत्यू झाल्याने धक्का बसला आहे आणि शोक व्यक्त केला आहे. शोकाकुल कुटुंबियांबद्दल माझे मनःपूर्वक संवेदना आणि जखमी लवकरात लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करतो, असे केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी म्हटलं आहे.